INDIA NEWS COMMUNICATIONS

| PUBLICATION | EDITION | DATE |
|---|---|---|
| Dainik Herald | Goa | 22/05/2017 |


# कामधेनू एनएक्सटी गोव्यात सादर

## पुढील पिढीचे इंटरलॉक स्टील नव्या युगाच्या संरचनांसाठी एक नवीन इंजिनियर्ड उत्पादन

पणजी, दि. २० :

पायाभूत विकासाच्या विश्वामध्ये एका नव्या आयामाची भर घालत, कामधेनू लिमिटेड यांनी या उद्योगाच्या वाढीमध्ये एका नवा मैलाचा टप्पा समाविष्ट केला असून बाजारपेठेत उच्च दर्जाचे इंटरलॉक स्टील सादर केले आहे. औद्योगिक उत्पादन निर्मितीमध्ये प्रागतिक मॉडिलवर काम करुन कंपनीने हे साध्य केले आहे. अतुलनीय शक्ती, परिपूर्ण क्षमता, अचूक भौतिक आणि रसायनिक गुणधर्म, प्रगत डबल रिब डिझाईन इ. कामधेनु एनएक्सटी इंटरलॉक स्टीलचे काही गुणधर्म आहेत जे कंपनीद्वारे भरपूर संशोधन आणि विकास केल्यानंतर अस्तित्वात आले आहे. हे भव्य उत्पादन रिएनफोर्समेंट संरचनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अन्य सामान्य स्टील बार्सच्या तुलनेत २.५ पट उत्तम आणि भक्कम इंटरलॉक पकड देते.




कळंगुट : कामधेनू एनएक्सटी सादर करताना सुनील अगरवाल व इतर.

कामधेनू लिमिटेड आपली नाविन्यपूर्णता आणि रिएनफोर्समेंट संरचना उभारण्यासाठी सर्वाधिक दर्जेदार उत्पादनांच्या निर्मितीसाठी योगदान देण्याकरिता नावाजलेली आहे. हे पुढच्या पिढीचे इंटरलॉक स्टील भूकंपांमध्ये उच्च संरचनांना अधिकतम सुरक्षितता देऊन त्यांना पूर्णपणे भूकंप रोधक बनवते. यासाठी, त्याचा वापर योग्य काँक्रीट मिक्ससोबत करावा लागतो. हा उत्तमप्रकारे डिझाईन केलेला स्टील बारमध्ये दोन गोलाकार रिब्ज असतात जे स्टील आणि काँक्रीटमधील इंटरलॉकचा भक्कमपणा द्विगुणित करतात.

गगनचुंबी संरचना आजच्या औद्योगिक विकासाची गरज बनल्या आहेत आणि त्यांचा भक्कमपणा आंतरराष्ट्रीय दर्जाचा असावा लागतो. स्मार्ट सिटीच्या संकल्पनेतून भारताचा नवा चेहरा तयार होत आहे आणि कामधेनु लिमिटेड या संकल्पनेसाठी भक्कम पाया घालण्यासाठी सुयोग्य अशी नाविन्यपूर्ण उत्पादने तयार करण्यात जोमाने कामाला लागलेली आहे. म्हणूनच कामधेनू एनएक्सटी भरपूर संशोधनाच्या अंती तयार झाले आहे जेणेकरुन पुढच्या पिढीतील संरचनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची ताकद आणि भक्कमपणा मिळेल', असं श्री. सुनिल अगरवाल, संचालक, कामधेनू लिमिटेड यांनी सांगितले.